ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ०४/०३/२०१०

ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त
सभा क्रमांक १५, दिनांक ०४/०३/२०१०
सभा सूचना क्रमांक ९, दि.०६/०२/२०१०
सभा क्रमांक २, दि.०४/०३/२०१०

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १७/०२/२०१० रोजी सभा सूचना क्रमांक ९, दिनांक ०६/०२/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता बोलाविण्यात आली होती. परंतु सदरहू दिवशी सभा तहकूब झाल्याने सदरची सभा गुरुवार दि.०४/०३/२०१० रोजी ठाणे महानगरपालिकेच्या ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात'' सकाळी ठिक ११.३० वा. ी सभा सूचना क्रमांक ९, दि.०६/०२/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री.अशोक बारकू वैती हे उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित सदस्य खालील प्रमाणे.

१. श्री.अशोक बारकू वैती - महापौर
२. श्री.मनोज विठ्ठल लासे - उपमहापौर

३. श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक
४. सौ.कविता सुरेश पाटील
५. श्री.मधुकर रामचंद्र पावशे
६. श्री.आनंदा तुकाराम केसरे
७. श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर
८. सौ.मिनाक्षी राजेंद्र शिंदे
९. श्री.रामचंद्र लहू फडतरे
१०. श्री.दिनेश मनोहर पाथरे
११. सौ.ताई मारुती भोंडवे
१२. श्री.राजेश रामचंद्र ठाकूर
१३. श्री.हणमंत ज्ञानू जगदाळे
१४. सौ.द्रौपदाबाई जगदिश इंदिसे
१५. सौ.अनिता अशोक सावंत
१६. श्री.नागसेन गंगाराम इंदिसे
१७. सौ.वनिता गंगाराम इंदिसे
१८. श्री.संजय देवराम भोईर
१९. श्री.देवराम लक्ष्मण भोईर
२०. श्री.रविंद्र माणिक पाटील
२१. सौ.महेश्वरी संजय तरे
२२. सौ.शारदा दादू पाटील
२३. श्री.राम हरी एगडे
२४. श्रीमती छाया मनोहर राव
२५. सौ.परिषा प्रताप सरनाईक
२६. श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के
२७. श्री.सुरेश चंदू कांबळे
२८. सौ.एकता एकनाथ भोईर
२९. श्री.पद्माकर संभाजी कांबळे
३०. सौ.अपर्णा नंदकुमार यादव
३१. श्री.दशरथ बाबुराव पालांडे
३२. श्री.संतोष वसंत वडवले
३३. कु.योगिता रमेश वैती
३४. श्री.संजय प्रभाकर सोनार
३५. श्री.अशोक राजाराम राऊळ
३६. श्री.सुधीर विष्णू कोकाटे

३७. श्री.संतोष गजानन साळवी
३८. श्रीमती मुल्ला फातिमा अंजुम मुहम्मद आसिफ
३९. सौ.रुपाली रमेश कदम
४०. श्री.मिलिंद माधव पाटणकर
४१. श्री.उमेश काशिनाथ कदम
४२. सौ.अनिता सुनिल गौरी
४३. श्री.दिनेश दाजी कांबळे
४४. सौ.अपर्णा मिलिंद साळवी
४५. श्रीमती सुरेखा सुरेश खातू
४६. श्री.अशोक नारायण भोईर
४७. श्री.मिलिंद भारत पाटील
४८. सौ.प्रमिला मुकुंद केणी
४९. सौ.शांता शामजी सोलंकी
५०. श्री.बिष्ट महादिप उर्फ मुन्ना
५१. सौ.सुहासिन (प्रतिभा) सुनिल लोखंडे
५२. श्री.नारायण शंकर पवार
५३. श्री.विलास शिवराम सामंत
५४. श्री.संजय संतू वाघुले
५५. सौ.सुजाता भास्कर पाटील
५६. सौ.अनिता हिराकांत फर्डे
५७. सौ.स्मिता मधुकर देशमुख
५८. श्री.जनार्दन कृष्णा खेतले
५९. श्री.राम पांडुरंग रेपाळे
६०. सौ.सुनिता (ताई) सुरेश सावंत
६१. सौ.प्रभावती माणिक पाटील
६२. श्री.जितेंद्र प्रभाकर वाघ
६३. सौ.निता मदन कदम
६४. श्री.मनोज तुकाराम शिंदे
६५. सौ.संगिता चंद्रगुप्त घाग
६६. श्री.चंद्रगुप्त सिताराम घाग
६७. श्री.घनश्याम शिवाजी कणसे
६८. श्री.संजय भाऊराव मोरे
६९. श्री.रविंद्र सदानंद फाटक
७०. श्री.पांडुरंग गोविंद पाटील
७१. श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
७२. श्री.लक्ष्मण (लच्छू) चंदूमल टिकमानी
७३. श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत
७४. श्री.राजेश आत्माराम खारकर
७५. श्री.सुभाष आत्माराम खारकर
७६. सौ.मनिषा महेश साळवी
७७. श्री.गणेश यशवंत साळवी
७८. श्री.राजेंद्र रमेश साप्ते
७९. सौ.अनिता बालाजी काकडे
८०. श्री.यासिन कुरेश अय्युब
८१. श्री.शिवदास नाना भगत
८२. श्री.रमाकांत दशरथ मढवी
८३. श्री.राजन नारायण किणे
८४. सौ.अनिता राजन किणे
८५. श्री.सुधीर रामचंद्र भगत
८६. श्री.महेंद्र वसंतराव कोमुर्लेकर
८७. श्री.डोंगरे सिराज अहमद अली
८८. श्रीमती अन्सारी अम्तियाज बानू
८९. श्री.सुभाष गणू भोईर
९०. श्री.नरेश गणपत म्हस्के
९१. श्री.अनिल गजानन सावे
९२. सनी वर्गीस थॉमस
९३. श्री.मिलिंद मनोहर साळवी

<u>सदर सभेस अनुपस्थित असलेले सदस्य खालील प्रमाणे.</u>

१. श्री.संजय रामचंद्र तांडेल
२. श्री.राजेश नामदेव सारंग
३. श्री.सुधाकर वामन चव्हाण
४. सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील
५. श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील
६. श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे
७. सौ.केवलादेवी रामनयन यादव
८. श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंह
९. श्री.राजन बाबुराव विचारे
१०. श्री.मुल्ला नजीब सुलेमान

११. श्री.मधुकर विठ्ठल होडावडेकर
१२. श्री.शैलेश तुकाराम शिंदे
१३. श्री.शैलेश तुकाराम शिंदे
१४. सौ.संगिता मिलिंद बनकर
१५. श्री.सचिन जयराम म्हात्रे
१६. श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसाहेब
१७. सौ.स्वाती महेंद्र कोमुर्लेकर
१८. श्रीमती नाईक हफीजा नसरुद्दीन
१९. श्री.अन्सारी असलम सलीम
२०. श्रीमती खान शगुफ्ता नसीर
२१. सौ.राऊत आशरीन ईब्राहिम
२२. श्रीमती शेख रझिया इकबाल शेख
२३. श्री.दिलीप रतन म्हात्रे
२४. श्री.पवन काशिनाथ कदम

<u>सदर सभेस रजेवर असलेले सदस्य खालील प्रमाणे.</u>

१. सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
२. श्री.हरिष काशिनाथ वैती

(छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास मा.महापौर पुष्पहार अर्पण करतात.)

मा.महापालिका सचिव :-

सभेचा अजेंडा वाचून दाखवितात व सभेस सुरुवात करतात.

महापौर महोदय, खालील प्रमाणे सन्मा.सदस्यांनी आजच्या सभेस गैरहजर असल्याबाबत लेखी कळविले आहे.

१) सन्मा.सदस्या सौ.स्मिता सुभाष इंदुलकर (माजी महापौर)
२) सन्मा.सदस्य श्री.हरिष काशिनाथ वैती

रजा मंजूर.....

मा.महापालिका सचिव :-

महापौर महोदया, आज या ठिकाणी काही दुखवटा ठराव आले आहेत ते मी वाचुन दाखविते.

१) शिवसेने ज्येष्ठ नेते श्री.मधुकर सरपोतदार यांच्या निधनाचा दुखवटा ठराव वाचून दाखवितात.
२) श्री.गोपाळराव गुळवे यांच्या निधनाचा दुखवटा ठराव वाचून दाखवितात.
३) राष्ट्रीय स्वयंसंघाचे कार्यकर्ते व भाजपाचे संस्थापकीय सदस्य श्री.नानाजी देशमुख यांच्या निधनाचा दुखवटा ठराव वाचून दाखवितात.
४) पर्फ्युम उत्पादन क्षेत्रातील जागतिक किर्तीचे मराठी उद्योजक आणि शिक्षण तज्ञ भाऊसाहेब तथा गोविंद दामोदर केळकर यांच्या निधनाचा दुखवटा ठराव वाचून दाखवितात.

(सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.)

(तद्नंतर मा.महापौर सो. दुपारी १२.३५ वा. सभा तहकूब झाल्याचे जाहिर करतात.)

दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २०६, दिनांक : ०४/०३/२०१०

ठराव :-

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख सन्मा.श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे विश्वासू सहकारी, झुंजार कामगार नेते, प्रभावी संसदपटू, कडवट हिंदुत्ववादी आणि शिवसैनिकांचे लाडके ''दादा'' श्री.मधुकर सरपोतदार यांचे शनिवार दि.२० फेब्रुवारी २०१० रोजी हिंदुजा रुणालयात हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांचे पश्चात पत्नी, मुलगा, स्नूषा, नातू असा परिवार आहे.

मधुकर सरपोतदार हे प्रखर कडवट हिंदुत्ववादी नेते म्हणून ओळखले जात. १९९२ ला मुंबई भडकलेल्या जातीय दंगलीत हिंदुंना आधार देण्यासाठी सरपोतदार कार्यकर्त्यांसमवेत सर्वत्र पायी फिरले. जनतेच्या प्रश्नावर अनेक आंदोलने लढवली. अनेक खटले अंगावर घेतले. शिवसेनाप्रमुखांचा शब्द कधीही खाली पडू दिला नाही. वयाच्या सत्तरीतही त्यांची काम करण्याची उमेद कायम होती. लोकसभा, विधानसभा आणि विधानपरिषदेतही जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडली. श्री.मधुकर सरपोतदार यांच्या दुःखद निधनाने संपूर्ण महाराष्ट्रभर हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मधुकर सरपोतदार यांच्या दुःखद निधनाने त्यांच्या कुटूंबियांवर दुःखाची कु-हाड कोसळली असून, हे दुःखद त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांना देवो व कै.मधुकर सरपोतदार यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना साश्रू नयनांनी भावपूर्ण आदरांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

सही/- अशोक बारकू वैती
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २०७, दिनांक : ०४/०३/२०१०

ठराव :-

पर्फ्युम उत्पादन क्षेत्रातील जागतिक किर्तीचे मराठी उद्योजक आणि शिक्षण तज्ञ भाऊसाहेब तथा गोविंद दामोदर केळकर यांचे दि.०१/०३/२०१० रोजी अल्पशा आजाराने मुलुंड येथील वोकहार्ड या इस्तितळात दुःखद निधन झाले.

पर्फ्युम उत्पादन क्षेत्रात त्यांनी उद्योगपती म्हणून आंतरराष्ट्रीय किर्ती मिळविली होती. त्याचबरोबर त्यांनी मुलुंड येथे केळकर महाविद्यालय स्थापन करुन शिक्षण तज्ञ म्हणूनही शिक्षण क्षेत्राचा स्वतःचा वेगळा असा ठसा उमटविला होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित कन्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे. उद्योग व शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांची त्यांच्या पार्थिव देहाचे आज त्यांच्या रहात्या घरी दर्शन घेवून मुलुंड येथील स्मशान भूमित साश्रू नयनांनी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

कै.गोविंद दामोदर केळकर यांच्या अकस्मात निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांवर दुःखाची कु-हाड कोसळली आहे. हे दुःख त्यांचे कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.गोविंद दामोदर केळकर यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना साश्रू नयनांनी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

सही/- अशोक बारकू वैती
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २०८, दिनांक : ०४/०३/२०१०

ठराव :-

राष्ट्रीय स्वयंसंघाचे कार्यकर्ते व भाजपाचे संस्थापकीय सदस्य आदरणीय श्री.नानाजी देशमुख यांचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले आहे. नानाजी देशमुख हे राष्ट्रीय स्वयंसंघाचे एक सच्चे व आदर्श कार्यकर्ते होते.

१९७७ साली केंद्रात जनता पक्षाचे सरकार असतांना, सन्मा.श्री.मोरारजी देसाई यांनी त्यांना देऊ केलेले मंत्रीपद त्यांनी स्वाभिमानाने परत केले व एक चांगला आदर्श भारतीयांपुढे घालून दिला.

मध्यप्रदेश मध्ये चित्रकुट या ठिकाणी असलेल्या आदीवासींचे जीवनमान उंचाविण्यासाठी त्यांनी १९७८ साली अथक प्रयत्न करुन त्यांना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यांत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच उत्तर प्रदेशातील गोंडा या परिसरात दारिद्रय रेषेखालील लोकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले व त्यामध्ये ते यशस्वी सुध्दा झाले. तसेच त्यांनी या परिसरात नागरिकांना आवश्यक असलेल्या मुलभूत सोयी-सुविधा देण्यांत महत्वाची कामगिरी केली होती.

अशा या महान कार्यकर्त्याचे दुःखद निधन झाले असून, त्यांच्या कुटूंबियांवर दुःखाची कु-हाड कोसळली आहे. हे दुःख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.नानाजी देशमुख यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा श्रध्दांजली पूर्वक आदरांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

सही/- अशोक बारकू वैती
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

दुखवटा ठराव

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २०८/१, दिनांक : ०४/०३/२०१०

ठराव :-

श्री.गोपाळराव गुळवे, माजी आमदार नाशिक जिल्हा यांचे काल अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. श्री.गोपाळराव गुळवे यांनी त्यांच्या कारकिर्दीत अध्यक्ष, जिल्हा परिषद नाशिक व अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस नाशिक ही पदे भुषविलेली आहेत. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत आपल्या कार्याचा ठसा नाशिक जिल्हयामध्ये उमटविलेला होता.

श्री.गोपाळराव गुळवे यांच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाची कु-हाड कोसळली आहे. हे दुःख त्यांचे कुटुंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.गोपाळराव गुळवे यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सूचक : श्री.पांडुरंग पाटील **अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे**

सही/- अशोक बारकू वैती
महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.)
(तद्नंतर मा.महापौर सो. दुपारी १२.३५ वा. सभा तहकूब झाल्याचे जाहिर करतात.)

महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा तहकूब झाल्याची वेळ : दुपारी १२.३५ वा.
दिनांक : ०४/०३/२०१०
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.